# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १३/०६/२०२३ चे ठराव**

---

**ठराव क्रमांक -३४५** **विषय क्रमांक –३४५**
**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३४५**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/८३/२०२३, दि. ०६/०६/२०२३ अन्वये, पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्ते/आरक्षणांच्या जागा आगाऊ ताब्याने घेताना द्यावयाचे प्रपत्र “अ” व “ब” साठी फी आकारणेबाबत. |
| **ठराव क्र. ३४५**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/८३/२०२३, दि. ०६/०६/२०२३ अन्वये, पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्ते/आरक्षणांच्या जागा विकसनाचे काम चालू करताना किंवा चालू करावयाचे असल्यास किंवा भविष्यात विकसनाचे काम करावयाचे असल्यास आगाऊ ताब्याने प्रपत्र “अ”व “ब”चे माध्यमातून घेण्याची कार्यपध्दती महानगरपालिकेने अवलंबली आहे. सदर “अ”व “ब”बाबतचे अर्ज नागरी सुविधा केंन्द्रामधून स्विकारावयाची असून प्रति अर्ज र.रू.१००/- फी निश्चित करणेत येत आहे. तसेच यापुर्वी दिलेले प्रपत्र गहाळ झाल्यास अथवा पुनश्चः प्रत आवश्यक असल्यास र.रू.२०००/- फी निश्चित करणेत येत आहे.सदर फी निश्चिती करून आकारणी करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३४६** **विषय क्रमांक –३४६**
**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३४६**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/१६/८४/२०२३, दि. ०६/०६/२०२३ अन्वये, दुबार विकास हक्क प्रमाणपत्र (DRC) अदा करणेसाठी शुल्क लागू करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३४६**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/१६/८४/२०२३, दि. ०६/०६/२०२३ अन्वये, नगररचना व विकास विभागामार्फत मिळकतधारक यांच्या रस्ता/ |

| | |
|---|---|
| | आरक्षणाने बाधित जागेसाठी मोबदला म्हणून विकास हक्क प्रमाणपत्र दिले जाते. तथापि, सदर विकास हक्क प्रमाणपत्र गहाळ होणे, विविध नोंदी ने विकास हक्क प्रमाणपत्र भरलेमुळे भविष्यातील नोंदी टंकलेखन करणेसाठी रखाने पुरेसे न रहाणे, भिजून खराब होणे, फाटणे तसेच, विकास हक्क प्रमाणपत्र धारक मयत होणे अशा विविध कारणास्तव दुबार विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नगररचना व विकास विभागाकडे प्राप्त होणाऱ्या टि.डि. आर, एफ. एस. आय, झोन दाखला, भाग नकाशा तसेच इतर आवश्यक अर्जांसाठी शुल्क आकारले जात असून दुबार विकास हक्क प्रमाणपत्र अर्जांसाठी कोणत्याही स्वरुपाचे शुल्क आकारले जात नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टिने शुल्क न आकारणे उचित होणार नाही. त्यामुळे दुबार विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत प्राप्त होणाऱ्या अर्जासाठी शुल्क आकारणे आवश्यक आहे. तरी, विकास हक्क प्रमाणपत्र गहाळ होणे, विविध नोंदी ने विकास हक्क प्रमाणपत्र भरलेमुळे भविष्यातील नोंदी टंकलेखन करणेसाठी रखाने पुरेसे न रहाणे, भिजून खराब होणे, फाटणे तसेच, विकास हक्क प्रमाणपत्र धारक मयत होणे अशा विविध कारणास्तव दुबार विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत प्राप्त होणाऱ्या अर्जासाठी र.रु.१००००/- शुल्क आकारणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३४७** **विषय क्रमांक –३४७**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३४७<br>दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/१२७/२०२३ दि.७/६/२०२३ अन्वये, सन २०२३ – २४ चे अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ठ करून तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३४७<br>दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/१२७/२०२३ दि.७/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ च्या मंजूर अंदाजपत्रकामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील खालील कामाचा सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन तरतूद करणेत आली होती. परंतु सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये नजर चुकीने कामाचे नाव व तरतुद समाविष्ट झाली नाही. तथापि यापुर्वी |

निविदा काढुन कामाचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये नाव समाविष्ट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता घेणे आवश्यक आहे. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात खालील तक्त्यात नमुद केलेले काम अंदाजपत्रकात नव्याने समाविष्ट करुन अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र./अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२३-२४ चा अंदाज | वर्गीकरण व आवश्यकते नुसार होणारी | | सन २०२३-२४ चे सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १ | प्रभाग क्र.१२ तळवडे गावठाण व परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करणे. (२२२३०९८१०) | किरकोळ देखभाल दुरूस्ती मुख्यालय | नविन काम | १०००००० | ० | ८००००० | ० | ८००००० |
| २ | प्रभाग क्र.१२ येथील रेणुका मंगल कार्यालय परिसरात नाला दुरुस्ती करून नाला ट्रेनिंग करणे. (222300642) | भांडवली 08-CULVERTS | ७६/७ | ५००००००० | ७५००००० | ० | ८००००० | ६७००००० |
| | | एकूण | | ६००००००० | ७५००००० | ८००००० | ८००००० | ७५००००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**ठराव क्रमांक -३४८** | **विषय क्रमांक –३४८**

**दिनांक- १३/०६/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

**विषय क्रमांक-३४८ दिनांक-१३/०६/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अक्षेका/प्रशा/३/कावि/९०/२०२३. दि.७/५/२०२३ अन्वये, ग.दि.माडगूळकर नाट्यगृह, निगडी प्राधिकरण येथील नाट्यगृह भाडे तत्त्वावर देणेकामी दराची मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ३४८ दिनांक-१३/०६/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अक्षेका/प्रशा/३/कावि/९०/२०२३. दि.७/५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेतील कार्यक्षेत्रात निगडी प्राधिकरण येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृह येत आहे. सदर

| | |
|---|---|
| | नाट्यगृहाचे उद्घाटन दिनांक १५/०५/२०२३ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आलेले आहे. निगडी प्राधिकरण येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृहाचे उद्घाटन झालेपासुन सदरचे नाट्यगृह हे भाडे तत्त्वावर मिळणेकामी नागरीकांची मागणी इकडील कार्यालयाकडे करण्यात येत आहे. निगडी प्राधिकरण येथे नव्याने उभारण्यात आलेले ग.दि.माडगूळकर नाट्यगृह हे नागरीकांना वापरण्याकरीता उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नाट्यगृह हे पी.पी.पी.अतंर्गत भाडे तत्त्वावर देण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. याकरीता मा.आयुक्तसो यांच्या समक्ष झालेल्या चर्चेनुसार, सदरची प्रकीया पुर्ण होईपर्यंत पी.पी.पी. अतंर्गत सर्व नाट्यगृह यांच्याकरीता निश्चित करण्यात आलेला दर हा नाट्यगृहाला लागु करणेकामी व तसेच अ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत सद्यस्थितीत नव्याने उभारण्यात आलेले से.नं.२६ व २७ निगडी प्राधिकरण येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृह याचे भाडे निश्चित करणे आवश्यक आहे. याकरीता नाट्यगृहाच्या भाडे दराची तक्ता प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावासोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केलेल्या दरानुसार निगडी प्राधिकरण येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृह हे भाडे तत्त्वावर देण्याकरीता भाडेदर निश्चित करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३४९** **विषय क्रमांक –३४९**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३४९**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.प्रेक्षा /१/कावि/१३१/२०२३, दि.०७/०५/२०२३ अन्वये, प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या नव्याने दरवाढीबाबत. |
| **ठराव क्र. ३४९**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.प्रेक्षा /१/कावि/१३१/२०२३, दि.०७/०५/२०२३ अन्वये, मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८२९३ दि. २८/१२/२००४ नुसार इकडील आदेश क्र. प्रेक्षा/१/कावि/८३५/२००५, दि. २८/०२/२००५ अन्वये दिनांक १ एप्रिल २००५ पासून प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे अनामत, भाड्याचे दर व इतर आकाराचे दरामध्ये वाढ करण्यात आली होती. सदरचे दर दिनांक १२/०५/२०२२ अखेर कायम असुन त्यामध्ये गेल्या १७ वर्षा मध्ये GST वगळता अन्य कोणतीही वाढ करणेत आलेली नाही.प्रा. रामकृष्ण मोरे |

| | |
|---|---|
| | प्रेक्षागृहाचा होणारा खर्च तसेच प्रेक्षागृहाचे भांडवली व महसुली खर्चाचा विचार करता मिळणारे उत्पन्न हे अत्यंत कमी असून खर्चाचे प्रमाण जास्त आहे. प्रेक्षागृह जरी उत्पन्नाचे साधन नसले तरी प्रेक्षागृहासाठी होणा-या खर्चाच्या तुलनेत भाड्याच्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाची १२०० आसनसंख्या ही मनपाच्या इतर नाट्यगृहापेक्षा जास्त असूनदेखील त्यांचेपेक्षा भाड्याचे दर खुपच कमी आहेत व गेली १७ वर्षे त्यामध्ये वाढ करणेत आलेली नाही. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे प्रस्तावित करावयाच्या दरांचा तपशिल प्रस्तावा सोबत सादर करणेत येत असून करणेत आलेली दरवाढ ही प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणारा भांडवली व महसूली खर्च तसेच सरासरी मिळणारे अत्यंत कमी उत्पन्न याचा विचार करुन करण्यात आलेली आहे. नव्याने केलेली विद्युतविषयक दरवाढ ही वॅटेजनुसार करणेत आलेली आहे. तसेच नाटयगृहासाठी पुढे लागणा-या अत्यावश्यक अशा नविन उपकरणांचा व साहित्यांचा समावेश करुन त्यांचे दर प्रस्तावा सोबत जोडलेल्या तक्त्यात प्रस्तावित केलेले आहेत. व सदरची दरवाढ ही दि.०१ जुलै २०२३ पासून लागू करणेस मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३५०** **विषय क्रमांक –३५०**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३५०**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जा.क्र.प्राशिवि/०९/कावि/१७०/२०२३ दिनांक ९/०६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थांना पुरविण्यात येणा-या सोई सवलतीसाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे व त्यावर रक्कम वर्ग करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३५०**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जा.क्र.प्राशिवि/०९/कावि/१७०/२०२३ दिनांक ९/०६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थांना शालेय शैक्षणिक साहित्य १) शालेय दफ्तर (सॅक),२) शालेय बूट व मोजे,३) शालेय पी टी बूट व मोजे, ४) कंपास पेटी, ५) फुटपट्टी (स्केल),६) वॉटरबॉटल,७) व्यवसायमाला,८) प्रयोगवही,चित्रकलावही,भूगोल नकाशावही,९) शालेय वह्या, १०) रेनकोट इत्यादीबाबत थेट लाभ हस्तांतर (DBT) करणेकामी मा.आयुक्तसो. यांचेकडे दिनांक - १३/०७/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्या अनुषगाने शालेय साहित्याचे दर निश्चित करणेकामी गठीत केलेल्या समितीने बुधवार दिनांक १०/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शालेय साहित्य खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतर (DBT) द्वारे इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी तील विद्यार्थ्यांना र.रु.३५००/- आणि इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांना र.रु.३७००/- इतकी रक्कम बॅक खात्यात जमा करणेस मान्यता दिलेली आहे.त्यानुसार मनपाच्या प्राथमिक शाळांमधील अंदाजे विदयार्थी संख्या ४४६०० गृहीत |

धरण्यात आलेली आहे. त्यापैकी इयत्ता १ली ते इयत्ता ४ थी च्या विद्यार्थांची संख्या २४३७१ एवढी असून र.रु. ३५००/- प्रती विद्यार्थी याप्रमाणे र.रु ८,५२,९८,५००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.इयत्ता ५वी ते ८वी विद्यार्थांची संख्या २०२२९ एवढी असून र.रु. ३७००/- प्रती विद्यार्थी याप्रमाणे र.रु ७,४८,४७,३००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.याप्रमाणे अंदाजे ४४६०० विद्यार्थांसाठी र.रु१६,०१,४५,८००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सबब, सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सदर रक्कमा विद्यार्थांच्या / त्यांच्या पालकांच्या बॅंक खात्यावर वर्ग करणे आवश्यक आहे. तथापि सन २०२३/२४ च्या अंदाजपत्रकात त्यासाठी लेखाशीर्ष तयार करण्यात आलेले नाही. तसेच त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२३/२४ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकात "थेट लाभ हस्तांतर" या नावाने नवीन लेखाशीर्ष तयार करून त्यावर आवश्यक ती रक्कम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | लेखाशीर्ष | तरतूद पानांक | मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | थेट लाभ हस्तांतर | - | - | १४४५००००००/- | - | १४४५००००००/- |
| २) | विद्यार्थी पादत्राणे व सॉक्स | | १५००००००/- | - | १५००००००/- | - |
| ३) | पी.टी.शुज व सॉक्स | | १५००००००/- | - | १५००००००/- | - |
| ४) | विद्यार्थी दफ्तरे व पाट्या | | २७५०००००/- | - | २७५०००००/- | - |
| ५) | पावसाळी साधने (रेनकोट) | | २४५०००००/- | - | २४५०००००/- | - |
| ६) | शालेय साहित्य (शालेय वह्या) | | २५००००००/- | - | २५००००००/- | - |
| ७) | शालेवार वॉटर बॉटल | | २५००००००/- | - | २५००००००/- | - |
| ८) | सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता व विकास - | | ५००००००/- | - | ५००००००/- | - |
| ९) | व्यवसायमाला /स्वाध्यायमाला | | ७५०००००/- | - | ७५०००००/- | - |
| | एकूण | | १४४५००००००/- | १४४५००००००/- | १४४५००००००/- | १४४५००००००/- |

वरील प्रमाणे नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे व त्यावर रक्कम वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

निर्णय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**ठराव क्रमांक -३५१** **विषय क्रमांक –३५१**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३५१**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. क्र.माध्य/शि/०४/कावि/२०४/२०२३ दि. १२/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना पुरविण्यात येणा-या सोई सवलतीसाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे व त्यावर रक्कम उपल्बध करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३५१**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. क्र.माध्य/शि/०४/कावि/२०४/२०२३ दि. १२/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत १८ माध्यमिक शाळा कार्यरत असून त्यामध्ये अंदाजे ८४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये मनपाच्या माध्यमिक विदयालयातील विदयार्थ्यांकरीता १) शालेय दफ्तर (सॅक),२)शालेय बूट व मोजे, ३) शालेय पी टी बूट व मोजे, ४) कंपास पेटी, ५) फुटपट्टी (स्केल),६)वॉटरबॉटल,७) व्यवसायमाला,८) प्रयोगवही,चित्रकलावही,भूगोल नकाशावही,९) शालेय वह्या, १०) रेनकोट इत्यादीबाबत DBT करणेकामी मा.आयुक्तसो यांचेकडे दिनांक - १३/०७/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने शालेय साहित्याचे दर निश्चित करणेकामी गठीत केलेल्या समितीने बुधवार दिनांक - १०/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शालेय साहित्य खरेदी DBT द्वारे करणेकामी तसेच इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी तील विद्यार्थ्यांना र.रु.३७००/- इतकी रक्कम बॅक खात्यात जमा करणेस मान्यता दिलेली आहे.त्यानुसार मनपाच्या माध्यमिक शाळांमधील ८४०० अंदाजे विदयार्थी संख्या गृहीत धरण्यात आलेली आहे. इयत्ता ५वी ते १० वी विद्यार्थांची संख्या ८४०० एवढी असून र.रु. ३७००/- प्रती विद्यार्थी याप्रमाणे र.रु ३,१०,८०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये थेट लाभ हस्तांतर (DBT)च्या रक्कमा विद्यार्थांच्या / त्यांच्या पालकांच्या बॅक खात्यावर वर्ग करणे आवश्यक आहे.तथापि सन २०२३/२४ च्या अंदाजपत्रकात त्यासाठी लेखाशीर्ष तयार करण्यात आलेले नाही. तसेच त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२३/२४ या आर्थिक वर्षात माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकात “थेट लाभ हस्तांतर”या नावाने नवीन लेखाशीर्ष तयार करून सदर लेखाशिर्षावर पुर्णाकींत र.रु. ३,११,००,०००/- उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.तरी प्रथमत: “थेट लाभ हस्तांतर”या नावाने नवीन लेखाशीर्ष तयार करणे तसेच सदर लेखाशिर्षावर माध्यमिक शिक्षण विभागाकडील विविध उपक्रम या लेखाशिर्षावरुन खाली नमूद केलेप्रमाणे र.रु. १०,००,००० /- इतकी तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण विभागाकडील विविध उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,००० /- इतकी तरतुद शिल्लक आहे. |

| अ.क्र | लेखाशीर्ष | तरतूद पानांक | मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | थेट लाभ हस्तांतर | - | - | १०,००,००० /- | - | १०,००,००० /- |
| २) | विविध उपक्रम | - | १०००००००/- | - | १०,००,००० /- | ९०,००,००० /- |

तरी उपरोक्त तपशीलाप्रमाणे “थेट लाभ हस्तांतर” नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे व तसेच सदर लेखाशिर्षावर माध्यमिक शिक्षण विभागाकडील विविध उपक्रम या लेखाशिर्षावरुन र.रु. १०,००,००० /- इतकी तरतुद वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३५२** **विषय क्रमांक –३५२**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३५२<br>दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जनि /कावि/तां./१५२ /२०२३, दिनांक १३ /०६ /२०२३ अन्वये, सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकातील पान क्र. ६८१ अ.क्र. २० “ताथवडे सर्व्हे नं. १९ येथील आरक्षण क्र.०६ येथे मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधणे “मधील कामाच्या नावात बदल करून “ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प(STP) बांधणे”कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३५२<br>दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जनि /कावि/तां./१५२ /२०२३, दिनांक १३ /०६ /२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहराच्या महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत ताथवडे या दाट लोकवस्तीच्या भागाचा समावेश होतो सदर भागात विविध गृह प्रकल्प तसेच इतर निवासी भागाचा झपाट्याने विकास होत असून नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी ताथवडे येथे नियोजित व बरेच वर्षे प्रलंबित असलेलामैलाशुद्धीकरण केंद्र (STP) बांधणे आवश्यक आहे. ताथवडे सर्व्हे नं. १९ येथील आरक्षण क्र.०६ येथे मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधणे करिताDP मध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षण हे पशु संवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत येते. त्यानुसार महानगरपालिके कडून २००९ पासून जागा ताब्यात घेणे संदर्भात पाठपुरावा सुरु आहे. दि. २७/०२/२०२३ रोजी मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांनी माननीय आयुक्त पशु संवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस जागा हस्तांतरीत करणेबाबत मान्यता दिली आहे. यामध्ये सर्व्हे नंबर १७ मधील ०.७ हेक्टर क्षेत्र मैलाशुद्धीकरण प्रकल्पा करिता देण्याचा प्रस्ताव पशु संवर्धन विभाग पुणे यांनी शासनास पाठविला होता. त्यानुसार मा.सह शहर अभियंता जलनि:सारण विभाग यांनी सल्लागार |

| | |
|---|---|
| | यांना विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेश दिले आहेत.<br><br>ताथवडे येथे नियोजित व बरेच वर्ष प्रलंबित असणारा मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधल्याने नदीचे प्रदूषण थांबणार आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदी प्रदूषण कमी होणेकामी मैलाशुद्धीकरण प्रक्रियेचे विकेंद्रीकरण (Decentralization) करणेकामी ताथवडे येथे नवीन मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार निविदा कार्यवाही करणेकरीता सुधारित प्रशाकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br><br>सदर ठिकाणी यापूर्वी प्रस्तावित जागेत 10 MLD क्षमतेचा STP करणेचा होता तथापि याभागात वाढणारी नागरी वस्ती लक्षात घेता 20 MLD क्षमतेचा STP प्रस्तावित करणेत येत आहे. त्यानुसार वर नमूद केलेल्या कामाचे तपशीलवार अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेकामी नेमण्यात आलेल्या तज्ञ सल्लागारांमार्फत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सुधारीत दरसुचीनुसार सदर कामाची अंदाज पत्रकीय रक्कम खालील प्रमाणे येत आहे.<br><br>**ताथवडे येथे मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधणे-** अंदाजपत्रकीय र.रु.४८,००,००,०००/- (अक्षरी- र.रु.अठ्ठेचाळीस कोटी फक्त)<br><br>वरील विषयांकित कामाचा पिंपरी चिंचवडमहानगर पालिकेच्या सन२०२२-२३च्या सुधारित व सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये भु. ग. यो. निधी अंतर्गत पा.क्र./आ.क्र.६८१/२० वर समावेश आहे. सदर सर्व साधारण स्वरूपाच्या कामासाठी ढोबळ मानाने अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,००,०००/- (अक्षरी-र.रु.तीस कोटी फक्त) व सन २०२३-२४ साठी र.रु.१,००,०००/- (अक्षरी-एक लाख फक्त) इतक्या तरतुदीस मान्यता आहे तथापि सदरची प्रशासकीय मान्यता रक्कम हि ताथवडे येथे नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) बांधणे कामांची अंमलबजावणी करणेकामी तांत्रिकदृष्ट्या निविदा काढण्याच्या दृष्टीने अपुरी आहे. वरील सर्व बाबींचा विचार करिता ताथवडे येथे नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे अत्यावश्यक असल्याने सदर विषयांतर्गत कामास खालील तक्त्यात सुचवल्या प्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>लेखाशीर्ष –भु.ग.यो निधी अंतर्गत |

| अ.क्र. | अंदाजपत्र कातीलपान/ अ.क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२३-२४ चा मुळ अंदाज | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ६८१/२० | ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे | ३०,००,००,००० | १,००,००० | मूळ कामाचे नाव व अंदाजपत्रकीय रक्कम |
| २. | | ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत मैलाशुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे | ४८,००,००,००० | १,००,००० | मुळ कामाचे नाव व सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम |

| | |
|---|---|
| | तरी नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदी प्रदूषणात होणारी वाढ रोखण्यासाठी ताथवडे येथे नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे कामी रक्कम रु. ४८००,००,०००/- (अक्षरी-र.रु.अठ्ठेचाळीस कोटी फक्त ) या रक्कमेस मा.महापालिका सभेची सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३५३** **विषय क्रमांक –३५३**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३५३**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/उ/१६/कावि/२७१/२३ दि.१३/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी ओएफसी केबल व डक्ट टाकणे व खोदलेला रस्ता पूर्ववत करणेया नवीन कामाच्या नावाचा समावेश, अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये वाढ - घट व प्रशासकीय मान्यतेबाबत. |
| **ठराव क्र. ३५३**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/उ/१६/कावि/२७१/२३ दि.१३/६/२०२३ अन्वये, उपरोक्त विषयास अनुसरुन मे.लार्सन अँण्ड टुब्रो लिमिटेड संस्थे समवेत दि.२५/०१/२०१९ रोजी कामाचा करारनामा करुन जा.क्र.पी.सी.एस.सी.एल./३ /ws/३८/२०१९, दि.२६/०२/२०१९ अन्वये कामाचा आदेश देणेत आलेला आहे. सदर कामांतर्गत City Fiber Network for Core, Aggregation and Accesses Layer, VMD Unipole& Gantry, Wi-Fi & CCTV & ITMS Poles, बसविणेचे काम चालु आहे. सदर कामांतर्गत आत्तापर्यंत Trenching and Ductingपध्दतीने ५६१.९०२ कि.मी. काम करण्यात आलेले आहे. सदर कामातुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत उभारणेत येणा-या CCTV Surveillance यंत्रणा जोडणी करणेकामी मे.L&T यांच्या कामातुन सुमारे १०० कि.मी. Trenching and Ducting चे काम करणेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.१७/११/२०२१ च्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामांतर्गत आत्तापर्यंत Trenching and Ductingपध्दतीने ९९.७३६ कि.मी. काम करण्यात आलेले आहे. मे. L&T यांचेकडील दि.५/९/२०२२ रोजीचे पत्रान्वये, मे.L&T यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका CCTV Surveillance प्रकल्पांतर्गत उर्वरित CCTV यंत्रणा जोडणी करणेसाठी अतिरिक्त ५० किमी. पेक्षा जास्त OFC Duct टाकणेचे काम करण्याची परवानगी मागितली आहे. त्यास अनुसरून M/s. E&Y (स्मार्ट सिटी कार्यालयाकडील सल्लागार) |

यांचेकडील दि.३०/१/२०२३ रोजीचा ईमेल अन्वये, मे.E&Y (PMU) यांनी पुढीलप्रमाणे कळविले आहे.

1) M/s L&T has completed the termination of 730 JBs out of 885 JBs wherein work-front for termination of 73 JB locations are available.

2) Work-front of remaining 82 JB locations out of 885 JB locations is unavailable to M/s Tech Mahindra. We have consider average 65 meter last mile connectivity required per JB & total approximate 5 km T&D for 82 Jbs

3) Network length (30KM) is increased because of the Trenching & Ducting work carried out at Bhopkel area, RLVD & Speed locations and OFC termination at nearest chamber length <50 mtr.

4) 80% of JBs locations are changed due to utility, local public issue for the PCMC Surveillance project. “In view of the aforesaid observations and supporting details enclosed herewith, PCSCL may take necessary decisions for additional T&D approval for the length of 50km which help to cover or integrate the all smart elements pertaining to PCSCL & PCMC Surveillance project” तसेच M/s. L&T कडून स्मार्ट सिटी मार्फत काम करावयाचे झाल्यास र.रु.१६,९०,३१,३५४/- इतका खर्च येईल असेही कळविले आहे. वरीलप्रमाणे ५० की.मी. OFC टाकणेचे काम PCMC Surveillance प्रकल्पाच्या Last Mile connectivity साठी M/s.E & Y ने वरीलप्रमाणे कळविलेनुसार करणेत येणार असून सदरील ५०की.मी.लांबीचे काम पूर्ण झाल्याशिवाय उर्वरीत PCMC Surveillance cameras व इतर स्मार्ट इलेमेंटस् ICCC ला Live दिसणार नाहीत व संपुर्ण प्रकल्प कार्यान्वित होत नाही.

सदरचा खर्च हा मे.L&T यांच्या निविदामर्यादा रकमेपेक्षा जास्त होणार आहे त्यामुळे या कामासाठी मा.आयुक्त यांनी स्वतंत्र निविदा काढण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत व यासाठी आवश्यक अंदाजपत्रकीय विषयाचे नाव व तरतुदीचा समावेश म.न.पा. अंदाजपत्रकामध्ये (Budgetary provision) करणे आवश्यक व त्यास तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतूदीमध्ये वाढ घट करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान | अ. क्र. | बजेट कोड | लेखा शीर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २३-२४ चा अंदाज | वाढ | घट | सन २०२३-२४ ची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सीसीटीव्ही सर्वेलन्स यंत्रणा उभारणे नवीन प्रकल्प | 636 | 2 | 232403801 | माहिती व तंत्रज्ञान विभाग | 2,00,00,00,000 | 54,99,20,800 | ---- | 5,00,00,000 | 49,99,20,800 |
| २ | पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी ओएफसी केबल व डक्ट टाकणे व खोदलेला रस्ता पूर्ववत करणे(नवीन काम) | | | | विशेष योजना | 17,50,00,000 | 5,00,00,000 | 5,00,00,000 | ---- | 5,00,00,000 |
| | एकूण= | | | | | | | 5,00,00,000 | 5,00,00,000 | 54,99,20,800 |

त्यानुसार खालील प्रमाणे

१) वरील तक्त्यानुसार नवीन कामाच्या नावाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस तसेच

२) उपरोक्त तक्त्यानुसार वाढ -घट रक्कम करणेस मंजूरी घेणेस तसेच

३) नव्याने समाविष्ट केलेल्या कामासाठी येणारा खर्च र.रु.१७,५०,००,०००/- या खर्चास

प्रशासकीय मान्यता घेणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३५४** **विषय क्रमांक –३५४**

**दिनांक- १३/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३५४**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. यांत्रिकी/०३/कावि/२२५/२०२३ दि.१३/६/२०२३ अन्वये, १५ व्या वित्तीय आयोगांतर्गत इलेक्ट्रिक ३ चाकी ऑटो रिक्षांकरीता पिं.चिं.म.न.पा. मार्फत सहाय्य अनुदान देणे बाबत. |
| **ठराव क्र. ३५४**<br>**दिनांक-१३/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. यांत्रिकी/०३/कावि/२२५/२०२३ दि.१३/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने पेट्रोल व डिझेलवर चालणा-या रिक्षांना CNG मध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरीता सन 2011 पासून 2020 पर्यंत CNG किट बसविलेल्या ऑटो रिक्षांना पिं.चिं.म.न.पा. पर्य़ावरण विभागामार्फत सहाय्य अनुदान देणेत येत होते. CNG किट करीता प्रत्येक रिक्षा मालकाला र.रु. 12,000/- सहाय्य अनुदान प्रमाणे एकुण 9 वर्षांच्या कालावधीत सुमारे 1400 रिक्षांना अनुदान देण्यात आले होते. पिं.चिं.शहरामध्ये आर.टि.ओ. मार्फत केवळ CNG रिक्षांचेच रजिस्ट्रेशन बंधनकारक केले असल्याने सन 2020 पासून अनुदान वाटप बंद केले होते. पेट्रोल डिझेलवर चालणा-या वाहनांसाठी स्वच्छ इंधन म्हणून मागील दशकात LPG व CNG सारख्या पर्यायांचा वापर सुरु झाला आहे. वाहन क्षेत्रात काही वर्षांपासून मोठा बदल होत आहे व इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरांना प्राधान्य दिले जात आहे. हवा प्रदुषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांची महत्वाची भुमिका असून, कोणत्याही प्रकारचे जिवाष्म इंधन न वापरल्याने एकुण वाहनांच्या वापराची कालमर्यादिमध्ये धुरावाटे शुन्य प्रदुषण होते. व शहरामध्ये जीतकी जास्त इलेक्ट्रिक वाहने तितकीच हवा स्वच्छ राहण्यास मदत होते. इलेक्ट्रिकल ऑटो रिक्षांना अनुदान देणे बाबतची कार्यवाही 15 व्या वित्त आयोगांतर्गत पिंपरी चिंचवड शहराला हवा प्रदुषणाबाबत (NCAP) करण्यात येणा-या कामांसाठी "EV based first and last mile connectivity" या विषयासाठी सन 2023 – 24 करीता उपलब्ध असलेल्या रक्कमेतुन पिंपरी चिंचवड शहरात पहिल्या 1500 इलेक्ट्रिक रिक्षांना प्रत्येकी र.रु. 30,000/- चे अनुदान दिल्यास यासाठी र.रु. 4,50,00,000/- ची आवश्यकता आहे. 15 व्या वित्त आयोगामध्ये हवा प्रदुषन कमी करण्यासाठी सर्वात जास्तीभर शहरामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यासाठी देणे बाबत सुचना करण्यात आली आहे. यामुळे सदर रक्कमेचा वापर इलेट्रिक ऑटो रिक्षांना अनुदान देणेकरीता योग्य होईल. अनुदान वाटपाची कार्यवाही पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या यांत्रिकी विभागामार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. अनुदान वाटपाबाबतचे अर्ज ऑनलाईन मागविणे तसेच अनुदान वाटपाबाबतची कागदपत्रे एकत्रित ठेवणे, त्यामध्ये ऑटो रिक्षांच्या आर.सी. पुस्तकाची झेरॉक्स, आलेल्या प्रस्तावाची तपासणी, आर.टी.ओ. |

| | |
|---|---|
| | कडील माहिती बरोबर जुळवून पडताळणी करणे, प्रस्तावाच्या रक्कमेचे बील लेखा विभागास सादर करणे व रिक्षा परमिटधारकास डी.बी.टी. पद्धतीने अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करणे या सर्वबाबी अनुदानाच्या प्रक्रियेसाठी करण्यात येणार असून या पद्धतीनूसार पुढील अनुदानाची कार्यवाही करणे शक्य आहे. नविन इलेक्ट्रिक तीन आसणी ऑटो रिक्षाची किंमत अंदाजे र.रु. 3.00 लक्ष असून भारत सरकारच्या FAMESubsidy व राज्य शासनाच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणामुळे किंमतीमध्ये र.रु. 1,10,000/- पर्यंतची सुट मिळते. या व्यतिरिक्त पिं.चिं.शहरामध्ये प्रोत्साहनपर म्हणून र.रु. 30,000/- अतिरिक्त अनुदान दिल्यास शहरामध्ये अंदाजे पहिल्या 1500 तीन आसणी ऑटो रिक्षांची संख्या जलदगतीने वाढण्यास मदत मिळेल व जिवष्मा इंधन वापरणा-या CNG रिक्षांऐवजी नविन इलेक्ट्रिक 3 आसणी रिक्षा घेण्याकडे कल वाढेल. पिंपरी चिंचवड शहरामध्ये माहे 17 मे 2023 अखेर अंदाजे 32355 ऑटो असून या सर्व रिक्षा CNG वर चालणा-या आहेत. सन 2022 पासून पिं.चिं. आर.टी.ओ. मध्ये इलेक्ट्रिक पॅसिंजर ऑटो रिक्षाची नोंदणी सुरु झाली आहे. आर.टी.ओ. माहिती प्रमाणे 01 पेक्षा जास्त इलेक्ट्रिक ऑटो रिक्षांची नोंदणी झाली आहे व या संख्येमध्ये दैनंदिन वाढ होत आहे. ही संख्या सुरुवातीला कमी असून कालांतराने वाढत जाणार आहे. या शिवाय अशा प्रकारच्या नविन आधुनिक तंत्राच्या प्रदुषण विरहित वाहनांना सुरुवातीस प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. जेणे करुन हवा प्रदुषण कमी करण्यास त्यांचा हातभार लागणार आहे. तरी २३ जुलै २०२१ पासून पिंपरी चिंचवड शहरात ज्या ऑटो रिक्षांनी इलेक्ट्रिक रिक्षा Electric (BOV), Three wheeler (passenger) Electric (BOV), Three wheeler (passenger) 3WT या प्रकारामध्ये पिं.चिं. आर.टी.ओ. मध्ये रजिस्ट्रेशन केले आहे अशा रिक्षांना पिं.चिं.म.न.पा. मार्फत सहाय्य अनुदान देणेआवश्यकआहे. सबब<br><br>१. इलेक्ट्रिक ऑटो रिक्षांसाठी अनुदानाबाबतची कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने करणेस<br><br>२. 15 व्या वित्तीय आयोगांतर्गत किंवा संयुक्तिक लेखाशिर्षावरुन पिंपरी चिंचवड शहरात नोंदणीकृत असलेल्या व ऑनलाईन पद्धतीने यांत्रिकी विभागाकडे परीपूर्ण अर्ज सादर करणा-या पहिल्या 1500 इलेक्ट्रिक रिक्षांना त्यांची सर्व कागदपत्रांची पुर्तता व पडताळणी झाल्यानंतर प्रत्येकी र.रु. 30,000/- (अक्षरी र.रु. तीस हजार फक्त) डी.बी.टी. पद्धतीने रिक्षा परमिट धारकाच्या बँक खात्यात जमा करण्यास मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**